काट

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** रामानंद **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0297 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/10/2021 16:52 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 15/09/2021
   **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/09/2021
   **Time From (वेळेपासून):** 14:53 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:36 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/10/2021 **Time (वेळ):** 16:40 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 029 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/10/2021 16:40 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** MJकॉलेज रोडवरील उप निबंधक सहक,जळगाव शहरातील

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** गोपाल भिका पाटील

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लॉट नं53 गट नं 347/1,श्रीराम सर्मथ कॉलनी पिंप्राळा,जळगाव ,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | प्लॉट नं53 गट नं 347/1,श्रीराम सर्मथ कॉलनी पिंप्राळा,जळगाव ,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-7588687318**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनोद रमेश सोनवणे | | | 1. घर नं48,रिघुर वाडा शनिपेठ,जळगाव, रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यातील फिर्यादी यांनी जळगाव शहरातील निमखेडी शिवार येथील रूद्रनगर सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादीत जळगाव येथील एक सदनिका खरेदी करण्याचे नियोजन केले होते त्याबाबत फिर्यादी यांनी सैदापावती केली आहे सदर सदनिकेचे तालुका उप.निबंधक सहकारी संस्था जळगाव कार्याल्यातील रेकार्डवर फिर्यादी यांचे नाव लावुन तसा दाखला देण्याचा मोबदल्यात तालुका उप.निबंधक सहकारी संस्था जळगाव कार्याल्यातील लिपिक श्री.विनोद सोनवणे यांनी फिर्यादी यांचे कडेस 5000/-रू.लाच मागणी केली त्याबाबत फिर्यादी यांनी दि. 15/09/2021रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव कार्यालयात समक्ष हजर होवुन तक्रार दिली होती. सदर तक्रारीची अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव पथकाने पंच साक्षीदारा समक्ष दि. 15/09/2021रोजी पडताळणी केली असता आलोसे यांनी फिर्यादी यांचे सदनिकेचे रेकार्डवर फिर्यादी यांचे नाव लावुन तसा दाखला देण्याचे मोबदल्यात फिर्यादी यांचे कडेस पंचा समक्ष प्रथम 5000/-रू.व तडजोडी अंती 4000/-रू.लाच रक्कमेची मागणी केली त्यानंतर वेळोवेळी सापळा स्थगिती पंचनाम्या दरम्यान सदर लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन गुन्हा.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** RAJESH SAHEBRAO SHINDE
**Rank (पद):** I (Inspector)
**No.(क्र.):** PBMH72648 **to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): vijay fakirrao shinde
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN73044

फिर्याद

रामानंद नगर पोलीस स्टेशन जळगांव
दि.२०.१०.२०२१.

**मी गोपाल भिका पाटील, वय ४५ वर्षे, धंदा. नोकरी, वाहक,म.रा.प.महामंडळ आगार, जळगांव रा. प्लॉट नं.५३,गट नं.३४७/१, श्रीराम समर्थ कॉलनी, पिंप्राळा,जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी दि.१५.०९.२०२१ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय जळगांव येथे हजर राहुन पोलीस उपअधिक्षक श्री.एस.एस.पाटील यांचेकडेस उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगाव येथील लिपीक श्री.विनोद सोनवणे यांचे विरुध्द लाचेसंबधी तक्रार दिली होती ती खालील प्रमाणे

जळगांव शहरातील निमखेडी शिवार येथील रुद्र नगर, सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित जळगांव यांचे गट नं. १२१/अ,३ प्लॉट नं.४१ ते ४६ मधील ३ एकुण क्षेत्र ९३.३८ चौ.मि.पैकी क्षेत्र ४६.६९ चौ.मि.सदनिकेचे मालक श्री.हेमराज लिंबा ठाकुर व श्रीमती निराशा हेमराज ठाकुर यांचेकडुन मी सदरची सदनिका साडे सहा लाख रुपयात खरेदी करण्याचे नियोजन केले आहे.त्याबाबत सौदा पावती केली आहे. सदर सदनिकेचे खरेदीपोटी मी श्री.हेमराज लिंबा ठाकुर यांना सर्व रकमेचे चेक अदा केले आहेत.सदर सदनिकेची पक्की खरेदी बाकी आहे. मी वर नमुद सदनिकेची सौदा पावती केली असल्याने सदरची सदनिका माझे नावावर करण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सचिव श्री.महेंद्र चौधरी यांनी माझे नावे संमती पत्र व ठराव दिलेला आहे.

सदर सदनिकेचे रेकॉर्डवर माझे नाव लावण्यासाठी व तसा दाखला घेण्यासाठी मी दि.१५/०९/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा.चे सुमारास उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगाव येथे गेलो. सदर कार्यालयात माझे वरील कामासंदर्भात विचारपुस केली. तेव्हा सदरचे काम हे कार्यालयातील लिपीक श्री.विनोद सोनवणे यांचेकडेस असल्याचे मला समजले. त्यानंतर मी लिपीक श्री.विनोद सोनवणे यांची भेट घेतली व त्यांना माझे जवळील कागदपत्र दाखवुन सदरची सदनिका माझे नावावर करणेबाबत व तसा दाखला देण्याबाबत सांगितले. तेव्हा लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी मला सांगितले की, या कामासाठी भरपुर वेळ लागेल, तुम्हाला जर लागलीच तुमचे काम करायचे असेल, तर तुम्ही मला ५,०००/–रु.आणुन द्या, मी लागलीच सदनिकेचे रेकॉर्डवर तुमचे नाव लावुन देतो व त्यानुसार लागलीच दाखला देतो असे सांगितले. तेव्हा लिपीक श्री.विनोद सोनवणे हे माझेकडेस ५,०००/–रु.लाच मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले. तेव्हा मी लिपीक श्री.विनोद सोनवणे यांना माझेजवळ आता एवढे पैसे नाहीत मी तुम्हाला दुपारी येवुन भेटतो असे सांगुन निघुन आलो आहे.बाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयात येवुन दि.१५.०९.२०२१ रोजी तक्रार दिली होती.

त्यानुसार दि.१५.०९.२०२१ रोजी श्री.पाटील साहेब यांनी दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर श्री.पाटील साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात अडकवुन मला पंच क्रं.१ यांचेसह जळगांव शहरातील एम.जे.कॉलेज रोडवरील उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगाव येथे लिपीक श्री.विनोद सोनवणे यांची भेट घेवुन लाचेसंबधी बोलणी करण्यासाठी पाठविले होते. तेव्हा लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी मला कार्यालयाच्या बाहेरील व्हरांडयाकडे हाताच्या इशारा करुन तिकडे थांबा असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे सदर कार्यालयाच्या व्हरांडयात जावुन थांबलो. त्यानंतर लागलीच काही वेळाने लिपीक श्री.विनोद सोनवणे हे मी व पंच क्रं.१ असे उभे असलेल्या ठिकाणी आले. तेव्हा लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी पंच क्रं.१ यांचेकडेस बोट दाखवुन मला हे कोण आहे? असे विचारले. तेव्हा मी ठरल्याप्रमाणे माझा पुतण्या आहे असे सांगितले. त्यानंतर लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी मला व पंच क्रं.१ अशांना हाताच्या इशा–याने खाली चालण्यास सांगितले. तेव्हा लिपीक श्री.विनोद सोनवणे, मी व पंच क्रं.१ असे सदर कार्यालयाच्या व्हरांडयातुन दुस–या मजल्यावरुन जिन्याच्या पाय–या उतरुन खाली जावुन एका बाजुला जावुन थांबलो. तेव्हा माझे व लिपीक श्री.विनोद सोनवणे यांच्यात माझे कामाबाबत व त्यासाठी आवश्यक त्या कागदपत्राबाबत चर्चा झाली. तेव्हा लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी मला कागदपत्रांच्या झेरॉक्स लागतील असे सांगुन प्रथम ५,०००/– रु. लाच मागणी केली. तेव्हा मी लिपीक श्री.विनोद सोनवणे यांना व्यवस्थित सांगण्यास सांगितले असता लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी मला एक हजार रुपये कमी द्या असे सांगुन तडजोडीअंती ४,०००/– रुपयाची लाच रक्कम मागणी केली. त्यानंतर लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी मला उद्या येण्यास व येतांना फोन करुन या असे सांगितले. तेव्हा मी त्यांना माझे जवळ फोन नंबर नाही असे सांगितले असता लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी मला त्यांचा मोबाईल फोन नंबर दिला. त्यानंतर मी व पंच क्रं.१ ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात परत आलो होतो.

त्यानंतर दि.१६.०९.२०२१ रोजी मी माझे खरेदीचे काम पुर्ण करुन ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात हजर झालो होतो. त्यानंतर मी माझे जवळील ४,०००/– रूपये त्यात ५००/– रूपये दराच्या ०८ नोटा समक्ष हजर केल्या होत्या. सदर नोटांना अ.पा.पावडर लावुन माझे जवळ दिल्या होत्या तसा सापळापुर्व पंचनामा केला आहे. त्यानंतर मी माझे मोबाईल फोनवरुन लिपीक श्री.विनोद सोनवणे यांचे मोबाईल फोनवर फोन लावला परंतु तो लागला नाही. त्यानंतर मला व पंच क्रं. १ यांना श्री. विनोद सोनवणे यांची भेट घेण्यासाठी उपनिंबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगाव येथे पाठविले होते.परंतु श्री.विनोद सोनवणे यांची भेट न झाल्यामुळे मी सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर मी माझे मोबाईल फोनवरुन पुन्हा लिपीक श्री.विनोद सोनवणे यांचे मोबाईल फोनवर फोन लावला परंतु तो त्यांनी रिसीव्ह केला नाही. तसा पंचनामा केला आहे.

20.10.2021

त्यानंतर दि.१७.०९.२०२१ रोजी मी जळगांव शहरातील एम.जे कॉलेजच्या मागील एकलव्य मैदानात हजर झालो सदर ठिकाणी सापळा पथक आले. त्यानंतर ४,०००/—रूपये लाचेची रक्कम माझेकडेस दिली. त्यानंतर मला पंच क्रं. १ यांचेसोबत श्री.विनोद सोनवणे यांची भेट घेण्यासाठी उपनिंबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगांव येथे पाठविले होते. परंतु तेव्हा देखिल श्री. विनोद सोनवणे यांची भेट न झाल्यामुळे मी सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर मला श्री. विनोद सोनवणे यांचा फोन आला व त्यांनी मला सांगितले की, मी नशिराबादला आहे, मी दुपारी तीन वाजेपर्यंत जळगांवला येतो, असे सांगितले. तेव्हा मी त्यांना जळगांवला आल्यावर कॉल करा असे सांगितले असता त्यांनी कॉल कट केला. त्यानंतर श्री.विनोद सोनवणे यांचा मला फोन न आल्यामुळे श्री पाटील साहेब यांनी मला पुन्हा श्री.विनोद सोनवणे यांचे मोबाईल फोनवर फोन करण्यास सांगितले त्याप्रमाणे मी फोन लावला असता त्यांनी फोन रिसीव्ह केला नाही.

त्यानंतर दि.२०.०९.२०२१ रोजी श्री.पाटील साहेब यांनी मला एकलव्य मैदान येथुन पंच क्रं. १ यांचेसोबत श्री.विनोद सोनवणे यांची भेट घेण्यासाठी उपनिंबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगाव येथे पाठविले होते. तेव्हा माझी व लिपीक श्री.विनोद सोनवणे यांचेशी भेट झाली. त्यानंतर मी लिपीक श्री.विनोद सोनवणे यांना मला चौधरींचा फोन आला होता असे सांगितले असता त्यांनी मी थोडसं कामामध्ये असे सांगितले. तेव्हा मी पुन्हा लिपीक श्री.विनोद सोनवणे यांना सांगितले की, चौधरीचा फोन आला होता, ते असे सांगत होते की, माझेकडे देवुन टाका. तेव्हा लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी मला नाही, माझा काही संबधच नाही त्याच्यामध्ये असे सांगितले. तेव्हा मी लिपीक श्री.विनोद सोनवणे यांना ते तुम्ही बोलले होते ना, तो विषय असे सांगितले. तेव्हा लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी मला नाही, नाही मी काही सांगितले बी नाही हे ते,आपला काही रोल नाही त्याच्यामध्ये असे सांगितले असता तेव्हा मी चौधरींना नाही सांगुन देवु का? असे सांगितले असता लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी ते आता मी कसं काय सांगणार हे तुम्हाला, असे सांगितले. तेव्हा मी पुन्हा लिपीक श्री.विनोद सोनवणे यांना चौधरीचं काय करु दादा, असे विचारले असता त्यांनी, आता मी काहीच बोलु शकत नाही, तुम्ही चौधरीला भेटा, माझा काही संबध नाही, असे सांगितले. तेव्हा मी चौधरीला देवुन टाकतो, मोकळं होवुन जातो असे सांगितले असता लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी मी नाही बोलु शकत तुम्हाला, असे सांगितले. तेव्हा मी माझे शर्टचे वरील डाव्या खिश्यात असलेली लाचेची रक्कम ४,०००/—रु.उजव्या हाताने खिश्यातुन बाहेर काढुन ती लिपीक श्री.विनोद सोनवणे यांचे समोर धरुन त्यांना देवु केली असता मी मागीतलेच नाही तर मी काय बोलणार त्याच्यात, तुम्ही चौधरींना भेटा, अन चौधरींना बोला तुम्ही, काय ते, माझा काही संबध नाही त्याच्यात, असे सांगुन लाचेची रक्कम स्विकारण्यास हाताच्या इशा—याने नकार दिला. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर मी दि.२९.०९.२०२१ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात हजर राहुन लिपीक श्री.विनोद सोनवणे यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. तसेच ते आता यापुढे माझेकडुन लाचेची रक्कम स्किारतील असे वाटत नाही. तसेच त्यांचे देहबोली वरुन त्यांना माझे विषयी संशय आला असावा म्हणुन त्यांनी लाच रक्कम घेतली नाही. बाबत जबाब दिला आहे.

त्या अनुषंगाने आज दि.२०.१०.२०२१ रोजी मला अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात बोलाविण्यात आले. त्यानंतर मी, श्री.पाटील साहेब, दोन शासकीय पंच व सापळा पथक असे आम्ही जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगांव येथे गेलो. तेव्हा मी सदर कार्यालयात लिपीक श्री.विनोद सोनवणे हे हजर असल्याचे श्री.पाटील साहेब यांना सांगितले. त्यावेळी श्री.पाटील साहेब यांनी लिपीक श्री.विनोद सोनवणे यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगुन लिपीक श्री.विनोद सोनवणे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर श्री.पाटील साहेब यांनी लिपीक श्री.विनोद सोनवणे यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव विनोद रमेश सोनवणे, वय—४६, व्यवसाय नोकरी, कनिष्ठ लिपीक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जळगांव रा.घर नं.४८, लिधुर वाडा, शनिपेठ, जळगांव जि.जळगांव असे सांगितले.

तरी विनोद रमेश सोनवणे, कनिष्ठ लिपीक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जळगांव यांनी दि.१५.०९.२०२१ रोजी १४.५३ ते १५.३६ वा.चे दरम्यान जळगांव शहरातील एम.जे.कॉलेज रोडवरील तालुका उपनिबंधक सहकारी संस्था जळगाव कार्यालयाच्या खाली पंचासमक्ष मी सौदापावती केलेल्या सदनिकेच्या रेकॉर्डवर माझे नाव लावुन तसा नाहरकत दाखला देण्याच्या मोबदल्यात माझेकडेस प्रथम ५,०००/—रु. व तडजोडीअंती ४,०००/—रु.लाचेची मागणी केली. अशा प्रकारे श्री.विनोद सोनवणे,लिपीक यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन माझेकडेस गैरमार्गाने ४००० रुपये लाच रक्कम मागणी केली व वेळोवळी सदर लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी स्वत: वाचुन पाहीली सदरची फिर्याद मी सांगितल्याप्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

20.10.2021

शशिकांत श्रीराम पाटील
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

फिर्याद देणा—याची सही